# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ ९३८ / २०२५ दि. २३ / ०१ /२०२५

## परिपत्रक

विषय:- राज्यातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत.

संदर्भ:- १. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय पत्र क्र./मशा/कार्या दि. १८/१२/२०२४

२. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/मावतं दिनांक २० ऑगस्ट, २०२४

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयान्वये राज्यातील ज्या ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात येईल. त्या त्या महाविद्यालयांना आपले सरकार सेवा केंद्र मंजुर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ च्या पत्रामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखले सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास प्रवृत्त करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहे.

करीता संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,

( रविंद्र पी. जुनघरी )
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# महाराष्ट्र शासन
## महसुल विभाग
## जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

07172-250350 E-mail! setu.chandrapur@gmail.com


पत्र क्र./पशा/कार्या-4/टे.12/ अ.का सेतु/2024/ 599 दिनांक :- 02 / 12/2024

प्रती,

मा.कुलगुरु
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
ता.जि.गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 5759 दिनांक 9.12.24
जावक क्र. ........ दिनांक........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 8628 दि. 7/12/2024
जावक क्र. 10699 दि. 9/12/24

विषय-: राज्यातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याबाबात.

संदर्भ-: 1. सामान्य प्रशासन विभाग(माहिती तंत्रज्ञान) यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-1724/प्र.क्र.45 /मावतं दिनांक 20 ऑगस्ट 2024.

2. मा.राज्य सेवा हक्क् आयुक्त,नागपूर विभाग,नागपूर यांचे अ.शा.पत्र क्र/सेहआ- नाग /संकीर्ण- ओ/कार्यालय/2490/24 दिनांक 10 सप्टेंबर 2024 प्राप्त दिनांक 25.09.2024

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने, वरील संदर्भ क्र.1 चे शासन निर्णयाअन्वये राज्यातील ज्या ज्या महाविदयांलयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात येईल.त्या त्या महाविदयालयांना आपले सरकार सेवा केंद्र मंजुर करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भीय पत्र क्र.2 अन्वये महाविदयालयीन विद्यार्थांना शैक्षणिक दाखले सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हयातील महाविदयालयांना आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास प्रवृत्त करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहे.

त्या अनुषंगाने चंद्रपुर जिल्हयातील आपले अधिनस्त महाविदयालयांना आपले स्तरावरुन आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत निर्देशीत करण्यात यावे .

**(टिप- कार्यालयीन टिपणी मा.जिल्हाधिकारी महोदय द्वारा अनुमोदित.)**

सहपत्र-: वरप्रमाणे

Signed by
Dagadu Sukhadev Kumbhar
Date: 01-12-2024 14:25:07
(डी.एस.कुमार)
निवासी उपजिल्हाधिकारी, चंद्रपूर

Rep. Registrar
07/12

A.R. (College)
Pl. Submit
9/12

कु. मनिषा
18/12/2024

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

राज्यातील महाविद्यालयांत आपले सरकार
सेवा केंद्र सुरु करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/मावतं**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
दिनांक - २० ऑगस्ट, २०२४.

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९.०१.२०१८
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.३१.०७.२०२४ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या CSC २.० योजनेंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून, सदर आपले सरकार सेवा केंद्राचे स्थापन, सनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविले आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये अहमदनगर जिल्ह्यातील १० तालुक्यामधील १५ महाविद्यालयांत प्रायोगिक तत्वावर आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

शासनाचा सदर निर्णय हा राज्यामध्ये अतिशय लोकप्रिय झालेला असून, अशा प्रकारे महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत राज्यातील इतर ठिकाणांवरुनही मागणी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव, सदर निर्णय राज्यभर लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ज्या ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात येईल, त्या त्या महाविद्यालयांना उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१९.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरुन आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाविद्यालयातील आपले सरकार सेवा केंद्रास मंजूरी देतांना संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या सल्ल्याने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच सदरील कार्यवाही करतांना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या. (महाआयटी), मुंबई यांचेशी तांत्रिक सहाय्याकरीता समन्वय साधावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०८२०१२०४३१८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUDAM EKNATH ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
Date: 2024.08.20 12:19:29 +05'30'

( सुदाम आंधळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,